# जहर

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**जहर : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# जहर

# १

बॉंबेसेंट्रल स्टेशनाच्या दिशेनं दक्षिणोत्तर जाणारा तो हमरस्ता दिवसा रहदारीनं गजबजलेला असतो. ट्रामगाड्या, बसेस, मोटारी, घोडागाड्या अशा वाहनांची गर्दी चालू असते. सायकलवाले आणि पादचारी यांचेही लोट उलट सुलट दिशेनं जात असतात. सेंट्रल स्टेशनाच्या जरा अलीकडे या रस्त्यावर मोठमोठ्या वृक्षांच्या कमानी बनलेल्या आहेत.

भर दुपारीदेखील रस्त्याच्या या भागावर चांगली छाया असते. वसंत आणि ग्रीष्म ऋतूंत या वृक्षांवर रंगीबेरंगी फुले बहरतात. बहर निघून गेला की रस्त्यावर पाकळ्यांचा आणि फुलांतल्या केसरांचा सडा पडतो. मध्यान्हाच्या घटकेला सूर्य माथ्यावर आला की प्रकाशाचे कवडसे रस्त्यावर खेळू लागतात. या शोभेकडे लक्ष द्यायला माणसांना मात्र वेळ नसतो. फुलपाकळ्यांचा आणि केसरांचा सुंदर थर किंवा कवडशांचे थरथरणारे ठिपके वाहनांच्या चाकांखाली किंवा माणसांच्या पायाखाली सांपडत असतात. त्यांची शोभा पहायला कुणाला सवड नसते. साऱ्या लोकांना आपलं मुंबईतलं घाईचं जीवन जगायचं असतं. खाण्यापिण्याची घाई, उद्योगधंद्याला जाण्याची घाई, बाजारहाट करण्याची घाई–अशा घाईचा द्रुत केरवा ताल धरून माणसांची दुनिया जगत असते. मोठमोठ्या वृक्षांच्या कमानदार शाखांनी झांकलेल्या या रस्त्यावर दुतर्फा उंच उंच मजलेदार चाळी आहेत. किराणा मालाची, भाजीपाल्याची, अंड्यांची दुकानं आहेत. एक आण्याच्या बिड्या, दोन पैशांची सुपारी, काथ, तंबाखू, तपकीर छोट्या छोट्या पुड्यांत बांधून देणारी छोटी दुकानं

आहेत. हॉटेल आहेत, पानपट्टीवाल्यांनी टीचभर जागेत मांडलेले आपल्या धंद्याचे संसार आहेत. फूटपाथवर भाजीवाल्यांचा, फळवाल्यांचा कलकलाट चाललेला असतो. एके ठिकाणी मार्केट आहे, त्याच्या प्रवेशद्वाराशी मासळीविक्या बायांनी मासळी मांडलेली दिसते. मधेच कुठेतरी गजरे-वेण्या तयार करण्यांत गुंतलेला फुलवाला दिसतो, बाबा लोकांची टोळकी पतंगांची काटाकाटी करीत असतात. किंवा उघड्या-नागड्या अंगानं नुसतीच धावत असतात. अधूनमधून कुठंतरी भांडण होतं, गाडीचा घोडा रस्त्यावर सरकून पडतो किंवा मोटारींची टक्कर होते. मग बघ्यालोकांचे घोळके जमा होतात. घटकाभर फुकट करमणूक करून घेतात काही वेळानं पांगतात. रस्त्यावरील रहदारीचा आणि गजबजाटाचा प्रवाह पुन्हां पूर्ववत सुरू होतो. अशा प्रकारं वृक्षाच्या सांवलीनं झांकलेला त्या हमरस्त्याचा हा भाग दिवसभर धांदलीनं गडबडीनं जागा असतो...

मात्र याच भागात एक घर असं आहे की, भोवतालच्या जागेपणाची त्याला बाधा होत नाही. सबंध दिवसभर हे घर शांत झोपलेलं असतं. रस्त्याला लागून या घराचं फाटक आहे, ते बंद असतं. फाटकाला दिंडी आहे तीदेखील क्वचितच उघडी असते. फाटकापाशी रखवालदार असतो किंवा नसतो. फाटकाच्या आंतल्या बाजूस आंगण आहे. आंगणांत नारळीची दोन उंच झाडं आहेत. मधोमध फुलवेलीचा जरा अस्ताव्यस्त असा कुंज आहे. दोन दुमजली इमारती एकमेकींना कोन करून सलग लागलेल्या आहेत. व्हरांडे आहेत. या इमारतींच्या तळमजल्यावरील दारं-खिडक्या दिवसभर बंद असतात. वरच्या मजल्यांच्या गॅलऱ्यांवर चिकाचे पडदे सोडलेले असतात. रस्त्यानं जाणाऱ्या येणाऱ्या माणसाला दिवसा या घरात माणसांची वर्दळ चुकूनसुद्धा दिसत नाही. या घरात वस्ती असेल अशी शंकादेखील येत नाही दिवसभर हे घर निजलेलं असतं...

संध्याकाळ झाली आणि रात्रीची चाहूल कानावर येऊ लागली की मग मात्र या घराला जाग येते. गॅलऱ्यांवरील पडदे कायमच असतात. परंतु त्याच्या फटीफटींतून दीपप्रकाशाच्या गुलाबी काड्या दिसूं लागतात. आंगणालगतच्या प्रवेशद्वारावरची लाल बत्ती पेटते. क्वचित् नोकराच्या नावानं मारलेली स्त्रीच्या आवाजातली हांक ऐकू येते. क्वचित् खालच्या व्हरांड्यांतून साजशृंगार केलेली एखादी स्त्री लगबगीनं जातांना आढळते... रात्र जसजशी वाढत जाते तसतशी या घराला अधिकाधिक



जाग येते. रस्त्यानं जाणाऱ्या येणाऱ्या सामान्य माणसांना समजतं की, दिवसभर शांत शून्य राहणाऱ्या या घरांतदेखील वस्ती आहे. आणि नुसतीच वस्ती नाही, तर या ठिकाणी काहीतरी गूढ आणि आकर्षक असं आहे. आंगणांतल्या लाल बत्तीवरून जाणती माणसं ओळखतात, की या घरांत पुरुषाच्या रात्रीच्या चैनबाजीची सोय असावी. 'लाल बत्तीची घरं' असं ज्यांना नांव दिलं जातं त्यांपैकी हे घर आहे. तेथे विलासी पुरुषांची सेवा करणाऱ्या पुण्यांगना असाव्यात. येथे शयनमंदिर सज्ज असावीत. रस्त्यानं जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांपैकी काहींना या घराचा प्रत्यक्ष परिचय असतो किंवा या घरांची ऐकून माहिती झालेली असते. त्यांना ठाऊक असतं की, 'नंबर १६ चं लाल बत्तीचं घर' म्हणून या घराची प्रख्याति आहे.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात हे घर चालविणारी 'मादाम सुझान' नावाची एक फ्रेंच बाई होती. तिच्याकडे एकाहून एक सुंदर आणि तरुण अशा इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश, अरब मुली होत्या. मादाम सुझानकडे 'बसायचं' झालं तर चाळीस पन्नास रुपयांचा सवाल असे. परंतु पाहुणा पैशाची फिकीर करीत नसे. मादामचा दिवाणखाना म्हणजे एक अत्यंत सुंदर शृंगारलेलं विश्रांतिस्थान होतं. मादाम आणि तिच्याकडच्या मुली संभाषणचतुर होत्या. मद्याचे पैसे निराळे द्यावे लागत असत, परंतु सर्व प्रकारची मद्यं मुबलक मिळत असत. घराची टापटीप आणि स्वच्छता कमालीची होती. अपायाची भीति नव्हती. फुलपांखरांचा डिझाईन ज्यावर आहे असा एक जपानी किमोनो अंगावरून घेतलेली 'मादाम' पांढऱ्या लांड्या केसांची आणि खूपच स्थूल अंगाची होती. तिचा गोरा गोरा वक्षभाग बॉडीसमध्ये मावत नसे. तिच्या कानात लांबलांब इअररिंग्ज असत. चेहरा रंगविलेला असे. ती सारख्या सिगारेट्स ओढीत असे. परंतु अशी ती लठ्ठ मादाम पायांतल्या सपाट तळाच्या सँडल्स फरफरावीत एखाद्या किशोरीसारखी लगबगीनं हिंडत असे. नोकरांवर आणि मुलींवर तिचा विलक्षण दरारा होता. पाहुण्या पुरुषांना ती आपल्या लाघवी भाषणानं आणि वर्तनानं खूष करून टाकीत असे... स्वातंत्र्यानंतर गोरं गिऱ्हाईक घटलं. मादाम सुझान आपला धंदा विकून निघून गेली. आता इथली घरमालकीण बकुळाबाई नांवाची एक स्त्री होती. आता या घरात इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश, अरब मुली नव्हत्या. पंजाबी, काश्मिरी आणि क्वचित् मराठमोळ्या मुली होत्या. पण त्याही निवडक आणि सुंदर होत्या. 'नंबर १६ चं घर' अजूनहि चैनबाज श्रीमंतांचं आवडतं विश्रामस्थान होतं...

बकुळाबाई या नावावरून ती महाराष्ट्रीयन असावी असं वाटण्यासारखं होतं. परंतु ती होती गुजराथी, रंगानं काळासावळी, अंगानं काहीशी स्थूल, पण बांध्यानं मोहक आणि नाकी डोळी मोठी ठसठशीत, डोक्यांत फुलं माळलेली, उंची वस्त्रांचा थाटमाट केलेली मध्यम वयाची बकुळाबाई बघितली की, ती 'घरवाली' वाटत नसे. आणि ती घरातल्या मुलीपैकी नसून 'घरवाली' असल्याचं कळल्यावरदेखील गुलहौशी गिऱ्हाइकांपैकी कित्येकांचं मन तिच्यावरच अधिक जडत असे. लालबत्तीच्या असल्या 'घरां'तल्या व्यवहारांचे काही संकेत ठरलेले आहेत. त्यातला एक असा की घरवालीजवळ कुणी, गिऱ्हाइकानं 'बसायचं' नाही. ती फक्त मालकीण आणि व्यवस्थापिका आहे असं समजायचं. परंतु बकुळाबाईचं सुस्वरूप असं मोह घालणारं होतं की, कित्येकजण हा संकेत धुडकावून तिच्याजवळ सुखाची याचना करीत असत. तिनं नकार दिला की, मागणी करणाराला वाटे, तिला जास्त पैसे हवेत. आणि मग तो म्हणे, 'हवे तितके पैसे मागा, पण हो म्हणा.' ज्यांच्याशी फारशी घसट नाही अशा पुरुषांना बकुळाबाई फक्त हंसून म्हणे, 'घरवालीशी असली बात करायची नसते हे ठाऊक कसं नाही तुम्हांला?' वारंवार येणाऱ्या जास्त परिचयाच्या माणसांना तिचं खरं कारण माहीत झालं होतं. मुंबईतल्या एका नामांकित श्रीमंत डॉक्टरांनी तिला ठेवलेली होती. त्यांच्याशी इमानानं वागण्यांत ती कधी कसूर होऊ देत नसे. १६ नंबरच्या घराचा उंबरठा विशेष भक्तीने झिजविणाऱ्या अगदी थोड्या लोकांना हे देखील माहीत झालं होतं की, बकुळाबाईचं हे 'घर' आणि धंदा अशा उत्तम रीतीनं चालला होता तो श्रीमंत डॉक्टरानं दिलेल्या भांडवलावरच. याबद्दल कुणी नापसंती अगर आश्चर्य दर्शविलं तर बकुळाबाई प्रतिपादीत असे, ''मुंबईतले कांही डॉक्टर इतके पैसेवाले झाले आहेत की, त्यांना पैसा कुठंतरी गुंतवावा असं साहजिक वाटतं. नुसत्या डॉक्टरीच्याच धंद्यावर हे लोक गबर झाले आहेत असं समजू नका. शेअर बाजारांत वायदे खेळणारे किती तरी डॉक्टर आहेत हाती खूप पैसा आला की मग ते तो कोणत्यातरी धंद्यात घालतात. टॅक्सी हांकणाऱ्या ड्रायव्हरांच्या गाड्या त्यांच्या मालकीच्या थोड्याच असतात? एकेक डॉक्टर वीस वीस पंचवीस पंचवीस गाड्या खरेदी करतो, आणि भाड्यानं लावून देतो. आणखी काही असलेच धंदे डॉक्टर मंडळी करतात. जसा टॅक्सीचा धंदा तसाच हा 'घरा'चा धंदा. आमच्या डॉक्टरांनी या धंद्यात भांडवल गुंतविलं तर आश्चर्य करण्यासारखं किंवा नापसंती



दाखविण्यासारखं काय आहे?'' बकुळाबाईचं हे 'लॉजिक' मुंबई शहरांतील जीवनाच्या अंतरंगावर विदारक प्रकाश टाकणारं होतं. तितकंच ते बिनतोडहि होतं. निदान तिच्या विशेष मैत्रीतल्या रंगेल श्रोत्यांना ते बिनतोड वाटण्यासारखं होतं खासच! अशा मित्रापैकी एखादा क्वचित बकुळाबाईला आग्रह करीत असे, ''तुमचे डॉक्टर आम्हांला एकदां दाखवा की'' पण ते ऐकताच 'शांतम् पापम्' अशा अभिप्रायाची मुद्रा करून बकुळाबाई तोडानं 'चक् चक्' आवाज करी आणि म्हणे, ''छे! भलंतच काय?'' भांडवलदार यजमान डॉक्टरांचं नावदेखील ती तोंडावाटे कधी काढीत नसे. 'आमचे शेट' येवढ्या दोनच मोघम शब्दांनी ती त्यांचा उल्लेख करीत असे...

असं हे १६ नंबरचं लाल बत्तीचं घर होतं, आणि अशी ही बकुळाबाई नावाची नवी 'घरमालकीण' होती. हे घर दिवसभर निजलेलं असे, रात्रीची पहिली घटा जवळ आली की ते जागं होत असे. आणि मग मोठमोठ्या वृक्षांच्या कमानींनी झाकलेल्या त्या हमरस्त्याची दुनिया ज्या वेळेस झोपी जात असे त्या वेळेस या घराची जाग वाढून चालू रहात असे, ती पहाटच्या पहिल्या प्रहरापर्यंत. सभोवतालची दुनिया नवा दिवस उजाडला म्हणून उठली, रस्त्यावरच्या हॉटेलांत कपबशांचा खळखळाट ऐकू येऊ लागला, दूधवाले भय्ये हिंडू लागले, चाळीचाळीतल्या बिऱ्हाडांत अरूणोदयाच्या घटकेला दिवे लागले की, या १६ नंबरच्या घरांतली लालबत्ती मिटीत असे. घरांतल्या साऱ्या शयनमंदिरांतले दिवे मालविले जात असत, खिडक्या दारं बंद होत असत; फाटकाची दिंडी लावून घेण्यात येत असे.

रात्रीचे दहा वाजण्याचा सुमार झाला होता. हमरस्त्यावरील रहदारी ओहोटली होती. दोन्ही बाजूंच्या फुटपाथवर अंथरुणं पसरली गेली होती. उशागती पाटी घेऊन पाटीवाले निजूं लागले होते. हॉटेलं उघडी होती, परंतु तिथं वर्दळ फार तुरळक होती. १६ नंबरच्या घरांत मात्र दिव्यांची रोषणाई झाली होती. पाणी मारून झाडून आंगण स्वच्छ केलं होतं. दारावरची लालबत्ती तेवत होती. फाटकाची दिंडी उघडी होती. बाहेरच्या बाजूस रखवालदार गुरखा होतां...

एक मोठी टॅक्सी वेगानं आली, आणि सफाईनं फाटकापुढं थांबली. टॅक्सीतून तीन तरूण खाली उतरले. त्यापैकी एकानं संपूर्ण लष्करी गणवेश केलेला होता त्याच्या कमरलेला रिव्हॉल्व्हरदेखील होता. हातांत छडी होती. टॅक्सीतून खाली उतरल्यावर हे तीन तरुण लगेच फाटकाकडे वळले नाहीत. गाडीच्या दाराशीच रेलून

ते कुणाला तरी म्हणाले, ''अरे भाई सुभाष, बसून काय राहिलास? उतर ना.'' आंत जो कुणी सुभाष बसला होता तो उतरेना. तो म्हणूं लागला, ''मला सांगितलंत की गाणं-बजाविणं ऐकायला जायचं, आणि इथं कुठं आणलंत मला? मी नाही उतरणार.'' रिव्हॉल्व्हरवाला तरुण आर्जवं करू लागला तेव्हा सुभाष म्हणाला, ''कॅप्टन अजय, तुझ्या वाढदिवसानिमित्त मौजमजा करायची म्हणून आपण एकत्र जेवलो. मग तू बूट काढलास की नायकिणीचं गाणं ऐकायचं; मला त्यांत काही वावगं वाटलं नाही, म्हणून तुमच्याबरोबर आलो-''

त्यावर अजय हंसून म्हणाला, ''अरे या घरांत तरी काय वावगं आहे?'' सुभाष म्हणाला, ''ते नाही मला सांगता यायचं. तुम्ही जा, मजा करा. याच टॅक्सीतून मी परत जातो.''

''ह्य:! असं कुठं झालंय?'' असं म्हणून कॅप्टन अजयनं छडी डाव्या खाकेत खोवली, आणि उजव्या हातानं सुभाषला पकडून ओढून खालीच उतरविलं. सुभाषच्याही अंगावर रिव्हॉल्व्हरवाचूंन बाकी सारा लष्करी गणवेश होता...

फाटकाच्या दिंडीपाशी सुभाषनं पुन्हां अडल्यासारखं केलं. पण''असं काय करतोस रे? चल''म्हणून कॅप्टन अजयनं त्याला आंत ओढलंच... ते चौघे तरुण अंगणांतून व्हरांड्याकडे जाऊ लागले.

त्यांची चाहूल ऐकल्यामुळंच की काय कुणास ठाऊक, बकुळाबाई व्हरांड्यांत आली. अजयला पहातांच ती म्हणाली, ''ओहो! कॅप्टसाहब, आइये, आइये! बहोत अरसा गुजरा. आज दिखाई दे रहे हो?'' अजयबरोबरच्या तिघा तरुणांकडेही तिनं हंसत हंसत बघितलं, बंदगी केली, आणि आधींचा खूप परिचय असल्याप्रमाणं मुद्रा करून ती त्यांना म्हणाली, ''आइये! आइये!'' पाठीवरचे शेपटे आणि नितंब उडवीत ती मुख्य दिवाणखान्याकडे गेली. कॅप्टन अजय आपल्या मित्रांना घेऊन दिवाणखान्यात शिरला...

दिवाणखाना सुंदर रीतीनं शृंगालेला तर होतात, परंतु आंत पाऊल टाकल्याबरोबर सुभाषच्या लक्षांत एक गोष्ट विशेषेकरून आली ती ही की, तिथल्या दिव्यांचा प्रकाश मंद आणि मोठा प्रसन्न होता. प्रकाश बघितल्याबरोबर माणसाच्या मनाला विसावल्यासारखं वाटण्याजोगं होतं. दारावर आणि खिडक्यांवर झुलणाऱ्या पडद्यांचा रंगही मंदच होता... बकुळाबाईनं पाहुण्यांना



मोठ्या आदबीनं बसविलं, आणि मग अजयला विचारलं, ''आपण आणि आपले मित्र काय घेणार?''

कॅप्टन अजयनं सिगारेट पेटविली आणि विचारलं, ''म्हणजे? पिण्याची सोय पूर्वीसारखीच आहे का तुमच्याकडे?''

बकुळाबाई हंसली आणि म्हणाली, ''आमच्याकडे साऱ्या सोयी पूर्वीसारख्याच आहेत.''

''नाही, दारूबंदीचा कायदा जारी आहे म्हणून विचारतो.''

''कायदा असेल जारी, पण तो बाहेर. या घरांत नाही. कायद्याचा अंमल करणाऱ्यांची आमच्यावर नजर असते. पण ती मेहेरनजर असते. त्यांना हवं असं आमच्याकडेही कांही असतंच की नाही?''

''अच्छा! अच्छा!''

''तुम्हां लष्करी लोकांना तेवढं वाटेल तितकं ड्रिंक मिळावं, आणि बाकीच्यांनी कोरडा अंमल सहन करावा असं तुमचं म्हणणं आहे की काय कॅप्टनसाहेब?''

''नाही, नाही, बकुळाबाई आम्ही एकदम मान्य करतो की या दुनियेत मन मानेल तितकं ड्रिंक मिळण्याच्या जागा दोनच. एक लष्करी छावणी आणि दुसरी बुकळाबाईचं घर!

''आतां कसं बोललांत कॅप्टनसाहेब! आणि शिवाय एक गोष्ट विसरू नका. तुमच्या छावणीत मिळेल फक्त बाटली. पण आमच्या या छावणीत बाटली तर मिळतेच, पण शिवाय-''

''आलं लक्षांत. आलं लक्षांत!'' असं म्हणून कॅप्टन अजय मोठमोठ्यांदा हंसला. कशी फटाकडी बोलणारी आहे बकुळाबाई अशा अभिप्रायानं त्यानं आपल्या मित्रांकडे बघितलं. साध्या पोषाखांतले दोघे मित्र खोखो करून हंसले. सुभाष मात्र हंसला नाही. या ठिकाणी बसणं त्याला फारसं सुखाचं वाटत नव्हतं. जे संभाषण तो ऐकत होता तेही त्याला रुचत नव्हतं. हातातली छडी बुटांच्या टोकावर मारीत खाली मान घालून तो बसला होता.

मधेच त्याची नजर समोरच्या भिंतीवरच्या कॅलेंडरकडे गेली होती त्या कॅलेंडरवर ऑस्ट्रियन बिअरच्या जाहिरातीतील सुंदर नग्न बाई होती, परंतु सुभाषचं लक्ष त्या चित्रापेक्षा तारखेकडे गेलं होतं, आणि ती तारीख पाहिल्यावर त्याचं मन अस्वस्थ